# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 30/10/2023 (सोमवार) दुपार

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या इसमाविरूद्ध कारवाई
## वाहनासह एकुण ६,०४,०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त
## पोलीस स्टेशन मौदाची कारवाई

दिनांक २९/१०/२०२३ रोजी सकाळी २०.०० वा. ते २०.३० वा. सुमारास पोलीस स्टेशन मौदा येथील स्टाफ हा पोस्टे मौदा हद्‌दीत पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदारांकडुन माहिती मिळाली की, मौजा चिचोली फाटा येथे अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक ट्रॅक्टर या वाहनाने होत आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून मौजा चिचोली फाटा येथे नाकाबंदी केली असता समोरून येत असलेल्या काळया रंगाचा ट्रॅक्टर क्र. MH-36 N-2926 ट्रॅक्टर चालकाला थांबण्याचा इशारा देवुन त्याला ट्रॅक्टर मध्ये भरलेल्या रेती बाबत परवाना बाबत विचारणा केली असता ट्रॅक्टर चालक आरोपी नामे— **विनोद रघुनाथ लेंडे वय ४० वर्ष रा. राजे देहेगांव जि. भंडारा** याने परवाना नसल्याचे सांगीतले. काळया रंगाचा ट्रॅक्टर क्र. एम. एच—३६/ एन—२९२६ किंमती अंदाजे ५,००,०००/— रू व ट्रॉली किंमती अंदाजे १,००,०००/—रू. मध्ये एक ब्रास रेती किंमती ४,०००/— रू. ची भरून रेतीची चोरटी वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीच्या ताब्यातून असा एकुण वाहनासह ६,०४,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— पोशि शिवाजी दिंडे पो.स्टे. मौदा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भा.द.वी सहकलम ४८(८) महा.जमीन महसुल अधिनीयम कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला सुचनापत्रावर सोडण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा असलम नौरंगाबादे, पोस्टे मौदा हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर